सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक : एनओटी-३६१७/सीआर-१३०/२०२२/जाहिरात** **दिनांक : ०७ सप्टेंबर, २०२२**

## -: शुद्धिपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा मुख्य परीक्षा - २०२१**
**महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा - २०२१ , परीक्षेच्या आयोजनाबाबत**
जाहिरात क्रमांक ०६३/२०२२, दिनांक १३ जुलै, २०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०२२ मध्ये नियोजित स्पर्धा परीक्षांच्या दिनांक ०१ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिद्ध अंदाजित वेळापत्रकानुसार महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०२१ ही दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी घेण्याचे नियोजित होते व त्यानुसार परीक्षा घेण्याचे प्रस्तावित होते. तथापि, संघ लोकसेवा आयोगाकडून दिनांक ०२ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२२ चे काही पेपर्स दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी घेण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे. दोन्ही परीक्षा एकाच दिवशी नियोजित असल्यामुळे पात्र उमेदवारांचे नुकसान होऊ नये, याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी नियोजित **महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०२१** चा दिनांक पुनर्निधारित करण्यात येत असून सदर परीक्षा **सोमवार, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२२** रोजी आयोजित करण्यात येईल.

**२.** सदर परीक्षेच्या आयोजनाकरीता दिनांक १३ जुलै, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचना/जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

सहसचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई